# नागरिकांना मिळतोय मानसिक आधार

## विद्यापीठ विशेष हेल्पलाईनकडे दिवसातून पाच फोन; विद्यार्थी, शिक्षकांची टीम कार्यरत

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊनच्या काळात नागरिक, विद्यार्थी, अत्यावश्यक सेवेत काम करणाऱ्यांचे कुटुंब यांच्यासह व्यापारी, विक्रेते हे शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या फोन-इन समुपदेशन हेल्पलाईनकडे अडचणी, समस्या मांडत आहेत. तज्ज्ञ समुपदेशकांकडून विद्यार्थी, नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक होत असून त्यांना मानसिक आधार मिळत आहे.

कोरोना विषाणूच्या साथीच्या अनुषंगाने नागरिकांमध्ये मानसिक स्वास्थ्य व इतर अडचणी, समस्या उद्‌भवत असल्याचे लक्षात घेऊन विद्यापीठाने विद्यार्थी, नागरिकांसाठी जिल्हा प्रशासनाच्या मान्यतेने समुपदेशन हेल्पलाईन कार्यान्वित केली आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांच्या मानसिक स्वास्थ्याकरिता फोन-इन




समुपदेशन उपक्रम ७ एप्रिलपासून राबविण्यात येत आहे. विद्यापीठात एमएसडब्ल्यू शिकविणारे शिक्षक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी अशी ३० जणांची टीम हेल्पलाईनद्वारे संचारबंदी काळात योग्य ती दक्षता घेऊन समुपदेशन करीत आहे. दररोज पाच फोन हेल्पलाईनवर येत आहेत.

हेल्पलाईनवर विद्यार्थ्यांकडून परीक्षा, करिअरसंदर्भातील अनेक प्रश्न येत आहेत. यात परीक्षा कधी होणार? त्याचे स्वरूप कसे असेल? स्पर्धा परीक्षांचे नियोजन योग्य वेळेत होणार का? करिअरचे काय होणार, अशी चिंता व्यक्त करणारे प्रश्न मांडले जात आहेत. दुसरीकडे एमआयडीसीमधील

> “ विद्यापीठाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या फोन-इन-समुपदेशन उपक्रमास विद्यार्थी, नागरिकांचा प्रतिसाद लाभत आहे. वेगवेगळ्या प्रश्न, समस्यांवर उत्तरे देऊन मानसिक बळ देण्याचे व आलेल्या परिस्थितीला तोंड देण्याची उमेद निर्माण केली जात आहे.
>
> **-प्रा. डॉ. अमोल मिणचेकर,**
> समन्वयक, समुपदेशन कार्यक्रम

कामगार, छोटे व्यावसायिक, विक्रेते यांच्याकडून लॉकडाऊन कधी उठणार? आणखी किती दिवस सोशल डिस्टन्सिंग पाळावे लागणार?, रोजगार, व्यवसायाची घडी बसणार का आदी अडचणी व्यक्त केल्या जात आहेत. कोरोना विषाणूच्या विरुद्धच्या युद्धात प्रत्यक्ष काम करणाऱ्यांच्या कुटुंबीयांकडून काळजी घेण्यासंदर्भातील फोन येत आहेत. त्यांच्याकडून कोरोना विषाणूसंदर्भातील माहिती जाणून घेतली जात आहे. लॉकडाऊनच्या काळात सर्वजण घरात अडकून पडलेले आहेत. अशा स्थितीत दीर्घकाळ सहवास लाभल्याने जोडीदारांमध्ये वादांचे प्रसंग उद्‌भवत आहेत. याबद्दलही मार्गदर्शन करण्याबाबतचे प्रश्न हेल्पलाईनकडे आले आहेत.

हेल्पलाईनवर आलेले प्रश्न समुपदेशकांकडून समजून घेतले जातात. समुपदेशनात कोणतीही विशेष मानसशास्त्रीय थेरपी वापरली जात नाही. सध्याची परिस्थिती तत्कालीक, सार्वत्रिक आहे. याकाळात शांत राहून विचार करा, स्वतःच्या आवडत्या गोष्टीत लक्ष गुंतवून घ्या, जवळच्या व्यक्तीशी फोनवरून संवाद साधा, असे नागरिकांना सांगण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण, व्यवसाय, रोजगाराबाबत धीराने समस्येला तोंड देण्याचे आवाहन समुपदेशक करीत आहेत.

# कोरोनाविरुद्धच्या लढाईला सज्ज

## सामाजिक बांधिलकी; क्वारंटाईनसह लॅब उभारण्यासाठी प्रस्ताव

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. १८ : देशभर सुरू असणाऱ्या कोरोना विरुद्धच्या लढाईत शिवाजी विद्यापीठानेही आपले योगदान दिले आहे. क्वारंटाईन विभाग सुरू करण्यासाठी वसतिगृह देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. प्रशासनाच्या मदतीला राष्ट्रीय सेवा योजनेचे दोन हजार स्वयंसेवक तयार आहेत. कोरोनासदृश व्यक्तींचे स्वॅब तपासण्यासाठी लागणारी प्रयोगशाळा उभारण्याची तयारीही प्रशासनाने दाखवली असून प्रस्तावही दिला आहे.

आता सुरू असणाऱ्या कोरोना विरुद्धच्या लढाईतही विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. कोरोनासदृश लक्षणे असणाऱ्या रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन प्रशासनाने क्वारंटाईन विभाग वाढवण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी तंत्र शिक्षण विभागाची चार वसतिगृहे देण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला त्यातील एक वसतिगृह रिकामे करून ते क्वारंटाईन विभागासाठी तयार केले आहे. सुमारे ५५० बेडचा क्वारंटाईन विभाग सुरू करण्यात येणार आहे.

> **शिवाजी विद्यापीठ ही केवळ एक शैक्षणिक संस्था नसून इथल्या कार्यपद्धतीला सामाजिक आयाम आहे. ज्या ज्या वेळी समाजासमोर काही प्रश्न उभे राहतात, त्या वेळी त्यांच्या सोडवणुकीमध्ये विद्यापीठाचा पुढाकार असतो. यातून संसाधनांचा उपयोग समाजाला होतोच; पण विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव जागृती केली जाते. कोरोनाचे संकट दूर करण्यासाठी प्रत्येक घटक सर्वतोपरी प्रयत्नशील आहे.**
>
> **डॉ. देवानंद शिंदे,** कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

येथे असणाऱ्या रुग्णांना जेवण आणि अन्य जीवनावश्यक वस्तूही दिल्या जाणार आहेत. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू आहे.

सध्या प्रशासनाला शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्याबरोबरच स्वयंसेवकांचीही गरज आहे. यासाठी शिवाजी विद्यापीठाने आपली दोन हजार स्वयंसेवकांची फौजच प्रशासनाच्या मदतीला दिली आहे. आपत्ती निवारणाचे प्राथमिक ज्ञान असणारे स्वयंसेवक प्रशासनाचा भार हलका करणार आहेत. विद्यापीठाने स्वॅब तपासणीच्या लॅब उभारण्याचेही ठरवले असून त्यासाठीचा प्रस्ताव संबंधित यंत्रणेकडे पाठवला आहे.




अलोक जत्राटकर



इचलकरंजीत शनिवारी पडलेल्या वळीव पावसाने विकासनगर येथे झाड रस्त्यावर पडले. त्यामुळे विद्युत तारा तुटल्या. दुसऱ्या छायाचित्रात कोल्हापुरात सायंकाळी वळवाच्या पावसापूर्वी आभाळ दाटून आले होते. त्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे दृश्य विलोभनीय दिसत होते.



कोल्हापूर : कुलगुरू निवासस्थानी कार्यरत सुरक्षारक्षकांना सॅनिटायझर व मास्क किट देऊन राष्ट्रीय सेवा योजनेच्या मोहिमेचा प्रारंभ करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. अभय जायभाये.

# शिवाजी विद्यापीठातर्फे सॅनिटायझर, मास्कचे वाटप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे विद्यापीठात अत्यावश्यक सेवेवर कार्यरत असणाऱ्या सेवकांबरोबरच विद्यापीठ कॅम्पसवरील रहिवाशांना सॅनिटायझर आणि मास्कच्या सुमारे १ हजार किटचे वाटप करण्यात आले. किट वाटप करत असताना कोरोनाच्या बाबतीत आवश्यक दक्षता घेण्याच्या सूचनाही सर्व संबंधितांना करण्यात आल्या. कॅम्पसवरील कर्मचाऱ्यांनी घरी राहावे, सुरक्षित राहावे, या दृष्टीने एनएसएसचा उपक्रम महत्त्वाचा आहे. सर्वच कर्मचाऱ्यांनी आरोग्य सुरक्षाविषयक निकषांचे पालन करून कोरोनाला पराभूत करावे, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

# कोरोना हॉस्पिटलसाठी १०० बेड

## माजी खासदार महाडिक : जिल्हा प्रशासनाच्या हाकेस दिला प्रतिसाद

कोल्हापूर, ता. १८ : जिल्ह्यात ५०० बेड क्षमता असणारे कोरोना हॉस्पिटल उभारले जाणार आहे. यासाठी महाडिक कुटुंबांकडून १०० बेड दिले जातील, अशी घोषणा धनंजय महाडिक यांनी केली. याबाबत आज त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली.

कोणत्याही सार्वजनिक आपत्तीवेळी महाडिक कुटुंबाने गरजूंना आधार देण्याचे काम केले आहे. सध्याच्या कोरोना संकट काळातही, कामगार, मजूर यांना तयार जेवणाची पाकिटे महाडिक कुटुंबीयांनी वाटली. हातावर पोट असलेल्या कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे किट देण्यात आले. आता जिल्हा प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत, महाडिक परिवाराने आपली सामाजिक बांधिलकी कृतीतून दाखवून दिली. कोरोनाविरुद्धची लढाई अधिक व्यापक करताना, खबरदारी म्हणून शिवाजी विद्यापीठ परिसरात ५०० बेडचे रुग्णालय सुरू करण्याचा प्रशासनाचा निर्णय आहे. प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत महाडिक परिवाराने १०० बेड किंवा २० स्वयंचलित आयसीयू बेड अथवा १०० बेडसाठी आवश्यक अन्य वैद्यकीय साधन सामुग्री देण्याची तयारी दर्शवली आहे.

माजी खासदार आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष धनंजय महाडिक, अमल महाडिक, पृथ्वीराज महाडिक, नाना कदम यांनी जिल्हाधिकारी दौलत देसाई, जिल्हा परिषद सीईओ अमन मित्तल, आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी यांच्याशी चर्चा केली. महाडिक परिवाराच्या वतीने हे साहित्य देण्याचे त्यांनी जाहीर केले.



**कोल्हापूर : महाडिक कुटुंबांकडून १०० बेडची मदत देण्यात येणार आहे. याबाबत जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्याशी चर्चा करताना धनंजय महाडिक. सोबत पृथ्वीराज महाडिक, सुनील कदम, अमन मित्तल, डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी.**

### मदतीचे आवाहन

कोल्हापूर म्हणजे दातृत्वाची नगरी आहे. अन्य व्यक्ती, सामाजिक संस्थांनीही कोरोनाग्रस्त रुग्णांवरील उपचारासाठी ५०० बेडचे नवे हॉस्पिटल उभे करण्यासाठी प्रशासनाला मदत करावी, असे आवाहन धनंजय महाडिक यांनी केले आहे.